**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४**

क्र.कोविमं/उ.मा.परीक्षा/ २९५६
दिनांक : ०९.०१.२०१९

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा सातारा/सांगली/कोल्हापूर

विषय : **उच्च माध्यमिक (इ.१२ वी ) फेब्रुवारी-मार्च २०२० परीक्षा प्रवेशपत्रांबाबत (Hall Ticket)**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी ) फेब्रुवारी-मार्च २०२० च्या परीक्षेस प्रविष्ठ होणा-या सर्व विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध होणार असून, त्यासंदर्भात कनिष्ठ महाविद्यालयानी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

१) फेबुवारी-मार्च २०२० इयत्ता १२ वी परीक्षेसाठी ऑनलाईन आवेदनपत्र सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे (Hall Ticket ) मंडळाच्या **www.mahahsscboard.in** अथवा **www.mahahsscboard.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. प्रवेशपत्रे college login मध्ये download करावयाची आहेत

२) फेबुवारी-मार्च २०२० इयत्ता १२ वी परीक्षेसाठी ऑनलाईन आवेदनपत्र सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे (Hall Ticket ) ऑनलाईन प्रिंट काढून विद्यार्थ्यांना द्यावयाची आहेत.

३) प्रवेशपत्राची (Hall Ticket ) ऑनलाईन प्रिंटींग करताना प्रिंट साठी विद्यार्थ्यांकडून कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये.

४) प्रवेशपत्राची (Hall Ticket ) ऑनलाईन प्रिंट काढलेनंतर त्यावर प्राचार्यांनी शिक्का मारुन सही करावयाची आहे.

५) प्रवेशपत्रामध्ये (Hall Ticket ) विषय व विषयाचे माध्यम इ. मध्ये दुरुस्त्या असतील तर कनिष्ठ महाविद्यालयानी तातडीने या कार्यालयात येवून दुरुस्ती करुन घ्यावयाची आहे. जेणेकरुन परीक्षा केंद्रावर वेळेत प्रश्नपत्रिका पुरविणे शक्य होईल.

६) प्रवेशपत्रामध्ये (Hall Ticket ) मध्ये विद्यार्थ्यांच्या नावांत,जन्मतारखेत तसेच विद्यार्थ्याचा फोटो, स्वाक्षरी इ. दुरुस्त्या असतील तर अशा दुरुस्त्या कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर करुन याबाबतचे शुल्क रोखीने मंडळ कार्यालयात अथवा चलनाव्दारे भरुन दुरुस्तीची एक प्रत तातडीने या कार्यालयास सादर करावयाची आहे.

७) विद्यार्थ्याकडून प्रवेशपत्र (Hall Ticket ) गहाळ झाल्यास कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर पुन:श्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने द्वितीयप्रत (Duplicate ) असा शेरा देऊन प्रवेशपत्र द्यावयाचे आहे.

८) प्रवेशपत्रावर (Hall Ticket ) विद्यार्थ्याचा चूकीचा फोटो असल्यास त्याजागी संबंधित विद्यार्थ्याचा फोटो चिकटवून फोटोवर प्राचार्यानी शिक्का मारुन सही करावी.

९) ज्या विद्यार्थ्यांचे No Candidate साठी मंडळाकडे प्रस्ताव सादर केले आहेत अशा विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे (Hall Ticket ) कोणत्याही परिस्थितीत संबंधित विद्यार्थ्यांस दिली जाणार नाहीत याची कनिष्ठ महाविद्यालयांनी दक्षता घ्यावयाची आहे.

विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत ( Hall Ticket ) वरीलप्रमाणे कार्यवाही करावी. त्यासंदर्भात काही तांत्रिक अडचण उदभवल्यास तातडीने या कार्यालयाशी संपर्क साधावा.

९.१.२०२०

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

Rao general

# प्रवेशपत्रिकेतील / कनिष्ठ महाविद्यालय यादीतील चुकांच्या दुरूस्तीसाठी कळविण्याचे प्रपत्र

**To be Submitted Before Examination**

प्रपत्र परीक्षेपूर्वी दोन दिवसांपर्यंत समक्ष सादर करणे आवश्यक आहे.

क. महाविद्यालयाचा क्रमांक :- | J | | | | | | | |

**HSC Examination of Feb.-March /Sept.-Oct. ________**

Proforma Indicating Errors in the Seat No. Wise College List of Candidates

| Sr.No. अ.क्र. | Application No. आवेदनपत्र क्र. | Seat No. बैठक क्रमांक | Name of Candidate विद्यार्थ्यांचे नाव | Orignal/Incorrect Position in the College List/Hall Ticket कनिष्ठ महाविद्यालय यादीतील/ प्रवेशत्रिकावरील नोंद | Correct Position as per the College Record क.महाविद्यालयाच्या अभिलेखाप्रमाणे आवश्यक दुरूस्ती |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

(प्रपत्र इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे.)

प्राचार्य

स्थळ - __________

दिनांक- __________